क्र.रेतीगट/गौख/टे-२/कावि-३६/१०
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक :- २९/०१/२०१०.

# नदीपात्रातील रेती/वाळूचा जाहीर लिलाव जिल्हा-ठाणे

सर्व जनतेच्या माहितीसाठी जाहीर करण्यात येते की, शासन निर्णय क्र.गौखनि-१०/२००३/प्र.क्र./५१/ख दिनांक ५ सप्टेंबर २००३ अन्वये ठाणे जिल्हयातील खाली नमुद केलेल्या **नदीपात्रातील** रेती गटात उपलब्ध असलेल्या रेती/वाळू साठयाचे उत्खनन/विक्री करणेचे अधिकार देणेकामी मोहरबंद निविदा मागवून, तसेच खुल्या लिलाव पध्दतीने अशी एकत्रित पध्दत अवलंबून **दिनांक** ०९/०२/२०१० रोजी जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, पहिला मजला, समिती सभागृह येथे खालील नमुद रेतीगट क्रमांक ४ या रेतीगटाच्या लिलावाची प्रक्रिया उपरोक्त तारखेस अनुक्रमे सकाळी १०.०० वाजता आयोजीत करण्यात आली आहे.

जाहीर लिलावाच्या व मोहरबंद निविदांच्या अटी/शर्ती बाबत माहिती जिल्हाधिकारी कार्यालय रेतीगट शाखेमध्ये तसेच ठाणे जिल्हयातील तहसिल सर्व, उपविभागीय अधिकारी सर्व व अपर जिल्हाधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार, यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध राहतील.

| अ. क्र. | प्रमुख रेतीगट क्रमांक | रेती उत्खनन करावयाच्या क्षेत्राचा तपशिल | उत्खननाची पध्दत/ साधने | भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा ठाणे यांचे सर्वेक्षणानुसार उपलब्ध रेतीसाठा परिमाण ब्रासमध्ये | उपलब्ध कालावधी करिता उत्खनना साठी अनुज्ञेय साठा (ब्रासमध्ये) | हातची किंमत रक्कम (रुपये) | निवीदा / अर्जा सोबत भरावयाची बयाणा रक्कम (रुपये). (रकाना ७ मधिल रक्कमेच्या १० टक्के प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | रेतीगट क्रमांक ४ ढोके-दापीवली लांबी ५.८रुंदी १०० खोली ७ मी | १) गावठाणापासुन कल्याण नर्सरी पर्यंत. | डुबी पध्दत | १५० | १५० | ६७,५००/- | ६७५०/- |
| २ | रेतीगट क्रमांक ४ आंबेशिव खुर्द लांबी ५.८ रुंदी १०० खोली ७ मी | १) एरंजाड पुल ते ढोके दापीवली | डुबी पध्दत | ५०० | ५०० | २२५,०००/- | २२५००/- |
| | | | **एकूण** | ६५० | ६५० | **२,९२,५००/-** | **२९२५०/-** |

## अटी व शर्ती

१) रेती गटात रेती उत्खनन करण्याचा कालावधी रेतीगटाचा ताबा घेतल्यापासुन **दिनांक** **३१/०७/२०१०** पर्यंत राहील व कोणत्याही कारणास्तव कोणत्याही स्वरुपाची मुदतवाढ देण्यात येणार नाही.

२) **अ**) उपरोक्त दोन रेतीगटाच्या लिलावाची सविस्तर माहिती तसेच लिलावात भाग घेण्यासाठीच्या अर्जाचे नमुने व कोरी निविदा, लिलावाच्या अटी/शर्तीसह स्वंतत्रपणे प्रत्येक रेतीगटासाठी रोख **रक्कम रु. १०००-००** जमा केल्यावर जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, चौथा मजला, रेतीगट शाखा, यांचे कार्यालयात लिलाव जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ते **दिनांक** ०८/०२/२०१० पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) कार्यालयीन वेळेत प्राप्त होतील.

**ब**) उपरोक्त दोन ही रेतीगटाच्या लिलावाचा अर्ज व निविदा प्रत्येक गटासाठी स्वतंत्रपणे भरणे बंधनकारक राहील.

३) उपरोक्त रेती गटाच्या लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या व निविदा भरु इच्छिणा-या व्यक्ती, संस्था यांनी वरील तक्त्यातील रकाना ८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधीत रेतीगटासाठी बयाणाच्या रक्कमेचा जिल्हाधिकारी ठाणे यांचे नावे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी, मोहरबंद निवीदा/लिलावात भाग घेण्याच्या अर्जासोबत लिलाव जाहिर झाल्याच्या दिनांकापासुन ते **दिनांक** ०८/०२/२०१० पर्यत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा खनिकर्म अधिकारी, तहसिलदार रेतीगट ठाणे यांचेकडे सादर करावा. **दिनांक** ०८/०२/२०१० रोजी सायंकाळी ५.३० वाजेनंतर कोणताही अर्ज अथवा निविदा स्वीकारली जाणार नाही.

४) मोहरबंद निविदा भरणा-या व्यक्ती/संस्था यांना खुल्या लिलावातही भाग घेण्याची अनुमती आहे.

५) **दिनांक** ०९/०२/२०१० रोजी प्रत्येक गटाची खुल्या लिलावाची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याच ठिकाणी त्याच वेळी मोहरबंद निविदा उघडण्यात येतील. खुला लिलाव व मोहरबंद निविदा यामध्ये जी जास्त रक्कम येईल त्यांच्या नांवे निविदेतील नमुद अटी व शर्तीच्या नुसार लिलाव अंतिम करण्यात येईल.

६) ज्या व्यक्तीच्या नांवे लिलाव/निविदा अंतिम करण्यात येईल त्याला देकाराच्या रक्क्मेच्या १/४ रक्कम लिलावाच्या दिवशी जिल्हाधिकारी ठाणे यांचे नावावर काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्ट द्वारे जिल्हा खनिकर्म अधिकारी, तहसिलदार रेतीगट ठाणे, यांचेकडे जमा करावी लागेल. जर देकाराच्या रक्कमेच्या १/४ रक्कम लिलाव धारकाने त्याच दिवशी शासन जमा केली नाही तर त्यांनी भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. व त्यांचे नांवे मंजूर केलेला लिलाव/निविदा रद्द करण्यात येईल.

७) लिलावातील /निविदेतील सर्वोच्च बोली स्वीकारल्यानंतर व १/४ रक्कम भरल्यानंतर १५ दिवसात बोलीच्या उर्वरित रक्कम भरण्यात येईल अशा हमीचे दायीत्व स्वीकारणा-या दोन व्यक्तीसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये २००/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा लिलावाच्या दिनांकापासुन ५ दिवसात करुन देईल. स्वत:च्या व असे दायीत्व स्वीकारणा-या दोन व्यक्तींच्या मालमत्तेचा तपशिल पुराव्यासह सादर करणे बंधनकारक राहील. असा करारनामा व उर्वरित ३/४ रक्कम निर्धारित कालावधीत जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे न दिल्यास भरलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधित रेती /वाळू गटाचा फेर लिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

८) रेती गटामध्ये रेती/वाळू साठा आहे किंवा नाही वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, तसेच वाळुचा दर्जा बाबत खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील.

९) ज्या व्यक्तीचा उच्चतम देकार स्वीकारण्यात येईल त्याला संबंधित रेती / वाळू गटाचे सर्वेक्षण भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून सर्वेक्षण करण्यांत आले असल्यास, त्याची सर्वेक्षण शुल्काची **रक्कम रु.** २,५००/- (रु. दोन हजार पाचशे मात्र) इतक्या रकमेचा संचालक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा पुणे यांचे नावाने काढण्यांत आलेला राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट लिलावाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावा लागेल.

१०)ज्या व्यक्तींच्या नांवे लिलाव अंतीम करण्यात येईल त्यांनी लिलाव उच्चत्तम बोलीच्या रकमेवरील इनकम टॅक्स विभागाकडील **२.०६ टक्के** टि.सी.एस. लिलावधारकास भरावा लागेल. याशिवाय केंद्र शासन/राज्य शासन यांच्या कराचे उत्तरदायित्व असेल तर ते भरणे बंधनकारक राहील.

११) अ) भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येऊ नये. तसेच नदीपात्र/नाला यांचे पात्र बदलून अथवा त्यांना हानी पोहचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही, याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

**ब**) तसेच ज्यांच्या नांवे लिलाव मंजुर करण्यांत येईल त्याला त्या गटाकरिता उपलब्ध कालावधीकरिता अनुज्ञेय साठयापेक्षा जास्तीचे उत्खनन करता येणार नाही.

१२) लिलाव स्विकारणे, तहकुब करणे, अथवा रद्द करणे, किंवा लिलावाचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही बाबतचे अंतिम निर्णयाचे अधिकार जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

लिलाव गटाचा तपशिल, लिलावाच्या अटी व शर्ती, उत्खननासाठी राखीव क्षेत्राची माहिती व भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने उत्खननासाठी दर्शविलेल्या क्षेत्राचे नकाशे इत्यादी माहिती जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे, चौथा माळा, रेतीगट शाखा, यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये पहावयास मिळतील.

सही /-
**(ए.एल.ज-हाड)**
**जिल्हाधिकारी ठाणे**

**टिप :- रेती लिलाव जाहीरनामा व इतर अटी शर्ती www.thane.gov.in या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध आहेत.**